लिडकॉम
# संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित
( महाराष्ट्र शासनाचा उपक्रम )

क्र. प्रशासन/वेबसाईट/२०१८-१९/ 1384 दि. १७/११/२०१८

प्रति,
संचालक
डेन्स्डर वेब सर्व्हिस प्रा.लि.
७२२, एमएचबी कॉलनी,
समता नगर,
सातपुर, नाशिक

**विषय :-** **महामंडळाच्या संकेतस्थळावर दि. ८/११/२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहीरातीच्या अनुषंगाने सुधारित जाहीरात प्रसिध्द करणेबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, महामंडळामध्ये कंत्राटी पध्दतीने तांत्रिक सल्लागार नेमणेबाबतची संक्षिप्त स्वरुपातील जाहीरात **"महाराष्ट्र टाईम्स"** या वृत्तपत्राच्या दि. ८/११/२०१८ रोजी नागपूर आवृत्ती वगळता अन्य संपूर्ण महाराष्ट्र आवृत्तीमध्ये व दि. १२/११/२०१८ रोजी नागपूर आवृत्तीमध्ये प्रसिध्द करण्यात आलेली असून सदरहू जाहीरातीचा संपूर्ण तपशील, अटी व शर्ती व सूचना महामंडळाच्या **www.lidcom.co.in** या संकेतस्थळावर दि. ८/११/२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

आता, सदरहू जाहीरातीच्या अनुषंगाने अनु. क्र. ३ व ४ येथे नमूद केलेल्या पदांकरिताची वयोमर्यादा अनुक्रमे ४५ व ४० वर्षापर्यंत च्या ऐवजी ५० वर्षापर्यंत असा बदल करण्यात आलेला असून अर्ज सादर करण्याकरिता दि. ७/१२/२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. व तसे शुध्दीपत्रक दि. १९/११/२०१८ रोजीच्या **"महाराष्ट्र टाईम्स"** या वृत्तपत्राच्या संपूर्ण महाराष्ट्र आवृत्तीमध्ये प्रसिध्द करण्यात येत आहे.

त्यामुळे, उपरोक्त वर नमूद बदलासह, संपूर्ण तपशीलासह सुधारित जाहीरात या पत्रासोबत जोडून आपणाकडे पाठवित आहोत. तरी, सुधारित जाहीरात दि. १९/११/२०१८


मुख्य कार्यालय : बॉम्बे लाईफ बिल्डिंग, ५वा मजला, ४५, वीर नरीमन मार्ग, मुंबई - ४०० ००१. • दूरध्वनी : २२०४ ७१५७ / २२०४ ४१८६ फॅक्स : (०२२) २२८३ ५८८१
E-mail : mktgprod@charmodyog.in • Web Site : www.charmodyog.com

रोजी महामंडळाच्या www.lidcom.co.in या संकेतस्थळावर अपलोड करण्यात यावी ही विनंती. तसेच सदरहू संपूर्ण जाहीरात ही आपल्या densder.services@gmail.com हया ई-मेलवर pdf file द्वारे सुध्दा पाठविण्यात येत आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

आपला विश्वासू,

(प्रविण के. जाहीर)
व्यवस्थापक (प्रशासन)

सोबत :- वरीलप्रमाणे.

D:\smita I\admin\smita\web site.doc